# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २४, १९४५ (शके)**

**(१) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री**
**(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) कामगार मंत्री**
**(५) उद्योग मंत्री**
**(६) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(७) महिला व बालविकास मंत्री**
**(८) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री**
**(९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

### नांदेड, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातील तसेच कळवा (जि.ठाणे) येथील शासकीय रुग्णालयांतील मृत्यूंकरीता जबाबदार असलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(१) * २१११८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.सचिन अहिर, श्री.एकनाथराव खडसे, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठवाड्यासह विदर्भातील अमरावती येथील शासकीय रुग्णालयातील अपुरे मनुष्यबळ व औषधांच्या तुटवड्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असून नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयांत २४ तासात १२ निरागस चिमुकल्यांचा आणि १२ प्रौढ व्यक्तींचा, तसेच छत्रपती संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात २४ तासात १५ जणांचा मृत्यू झाला असून त्यात २ नवजात बालकांचा समावेश असल्याची बाब तसेच कळवा (जि.ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात २४ तासात १८ रुग्णांचा मृत्यू व नागपूर येथील शासकीय रुग्णालयात २४ तासांत २३ रुग्णांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सन २०२२-२३ या वर्षाची औषध खरेदी करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून सुमारे १०७ कोटी रुपयांचा प्रस्ताव हाफकिन या संस्थेकडे पाठविण्यात येऊनही ५० कोटी रुपये हाफकिनला उपब्ध करुन दिले असून उर्वरित ५७ कोटी रुपये शासनाने हाफकिनला दिले नसल्यामुळे औषध खरेदी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मृत्यू पावलेल्या रुग्णांमध्ये नवजात बालक, बालिकांसह सर्पदंश, विष प्राशन तसेच अन्य आजाराच्या रुग्णांचा समावेश असल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले असून रुग्णांचे मृत्यू हे प्रामुख्याने औषधोपचार न मिळाल्यामुळे तसेच रुग्णांलयातील प्रसाधनगृहातील कचऱ्यामुळे व अस्वच्छतेमुळे तसेच डॉक्टरांची कमतरता, नर्सिंग स्टाफच्या बदल्या, अपुरा निधी इत्यादी कारणांमुळे झाले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०२३ मध्ये वैद्यकीय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या औषधी खरेदी प्रस्तावाप्रमाणे शासनाने निधी वेळेवर उपलब्ध करुन न दिल्यामुळे औषध खरेदी होऊ शकली नसल्याने हाफकिनने १२०० कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत जमा केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू रुग्णांलयातील रुग्णांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच रुग्णालयात पुरेसे मनुष्यबळ व औषधे उपलब्ध करून देण्याबाबत व मृत्यू पावलेल्या रुग्णांच्या वारसास/कुटुंबियांस शासनाने आर्थिक सहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) या प्रकरणी संचालनालयामार्फत केलेल्या चौकशीत आढळून आलेल्या त्रुटी दुर करण्याची कार्यवाही चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला येथे टेक्स्टाईल पार्क व एज्युकेशन मॅन्युफॅक्चरींग हब उभारणीबाबत

**(२) * २१९३४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम विदर्भातील जिल्हयांचा सर्वांगीण विकास व्हावा तसेच कापूस उत्पादक शेतकऱ्यांची दैन्यावस्था संपुष्टात येऊन सुशिक्षित बेरोजगारांना काम मिळावे या हेतूने सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने अकोला येथे टेक्स्टाईल पार्क उभारण्याची घोषणा केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाळापूर तालुक्यात (जि.अकोला) जागा निश्चित केली असून औद्योगिक वसाहतीमध्ये १९ भूखंड आरक्षित करण्यात आल्याचे तसेच टेक्स्टाईल पार्क सोबतच शिक्षण उत्पादन केंद्र उभारण्याचाही निर्णय घेण्यात आल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनस्तरावर व मा.जिल्हा पालकमंत्री व मा. वस्त्रोद्योग मंत्री यांचेकडे पाठपुरावा करुनही जवळपास आठ-दहा वर्षांचा कालावधी होऊनही अद्याप त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने गत ८-१० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अकोला येथील टेक्स्टाईल पार्क व एज्युकेशन मॅन्युफॅक्चरिंग हब उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अकोला विकास केंद्र स्थापण करणे कामी एकूण ६६१.४३ हेक्टर आर जमीन संपादित जमीनीपैकी टेक्सटाईल पार्क १०० हेक्टर आर क्षेत्र राखीव ठेवण्यात आले आहे. या क्षेत्रामध्ये एकूण ५० आरेखीत भूखंड वाटपास उपलब्ध असून त्याचे क्षेत्रफळ ४३.८३ हे. आर आहे. या क्षेत्रामध्ये सामाईक सोयी सुविधा म. औ. वि. महामंडळाकडून पुरविण्यात आल्या आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शासकीय दंत रुग्णालयांमधील ऑनलाईन सेवा सुरु करण्याबाबत

**(३) * २१३३६ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयात रुग्णांची नोंदणी ते डॉक्टरांना अहवाल दाखविणे इत्यादी ऑनलाईन सेवा सुरु करण्यात आल्या नसल्याचे तसेच या रुग्णालयामधील सिटीस्कॅन मशिन मागील ६ महिन्यांपासून बंद असल्यामुळे कॅन्सर व फॅक्चर इ. चे निदान केले जात नसल्याने गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयात ऑनलाईन सेवा सुरु करुन बंद पडलेल्या सोयी-सुविधा दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) राज्यातील वैद्यकीय, दंत व आयुष महाविद्यालयांमध्ये शासनाने दिनांक ११ जुलै, २०२३ च्या आदेशान्वये रुग्णालय व्यवस्थापन प्रणाली (HMIS) ही ऑनलाईन सेवा सुरु करण्यास मान्यता प्रदान केली आहे. CBCT (CT Scan) यंत्र बंद असल्यामुळे कॅन्सरपासून फॅक्चर इ. चे निदान केले जात नसल्याने गोरगरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयांत जावे लागत असल्याची बाब खरी नाही.
(२) शासन मान्यतेनुसार सदर प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी GeM पोर्टलद्वारे निविदा प्रकिया लवकरच आयुक्त स्तरावरून राबविण्यात येत आहे.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## भानगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील नळ पाणीपुरवठा योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत.

**(४) * २१९८६ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भानगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील जलजीवन योजनेंतर्गत मंजूर असलेले नळ पाणीपुरवठा योजनेचे काम मागील दीड वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन योजनेंतर्गत व हर घर जल घोषणेनुसार भानगाव (जि.अहमदनगर) गावासह वाड्या वस्त्यांवर पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने निधी देऊनही अद्याप काम सुरु न झाल्याने शेकडो नागरिक पाणीपुरवठ्याच्या योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भानगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे जलजीवन योजनेंतर्गत मंजूर असलेले नळ पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही. जल जीवन मिशन अंतर्गत भानगाव योजनेचे उर्ध्ववाहिनीचे व वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण असून, उंच टाकीचे पहिल्या टप्प्यापर्यंत काम पूर्ण झालेले आहे. योजनेचे काम प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत भानगाव गावठाण व तीन वाड्या वस्त्यांना अस्तित्वातील योजनेद्वारे पाणीपुरवठा चालु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यात रोजगार निर्मितीकरीता औद्योगिक क्षेत्र कार्यान्वित करण्याबाबत

**(५) * २१८३० श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे मोठे उद्योग अस्तित्वात नसल्याने जिल्ह्यातील नागरिक उदरनिर्वाह करण्यासाठी गुजरातसह इतर ठिकाणी स्थलांतरीत होत असून नंदुरबार जिल्ह्यात भालेर आणि नवापूर येथे २ मंजूर औद्योगिक क्षेत्राकरीता आवश्यक जमीन संपादित करताना स्थानिकांना नोकरीत प्राधान्य देण्यात येईल असे आश्वासन देऊनही नवापूर येथील औद्योगिक क्षेत्रातील उद्योगात स्थानिकांना रोजगार न देता परराज्यातील लोकांना रोजगार दिला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भालेर येथील औद्योगिक क्षेत्र कार्यान्वित करण्यात येऊन स्थानिकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी लोकप्रतीनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) याबाबत लोकप्रतिनिधीकडून मागणी पत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे आढळुन येत नाही.

(३) (i) भालेर औद्योगिक क्षेत्रात २८५.५८ हे.आर क्षेत्रावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत विकास कामे करण्यात आले असून एकूण ४०९ भूखंडाचे आरेखन केले आहे. त्यापैकी ५५ भूखंडाचे वाटप झालेले आहे. ०१ भूखंडावर बांधकाम सुरु आहे. वाटप केलेल्या भूखंडावर अद्याप उत्पादन सुरु झालेले नाही.

(ii) नवापूर औद्योगिक क्षेत्रात ६४.१९ हे.आर क्षेत्रावर औद्योगिक क्षेत्र विकसीत करण्यात आले आहे. यामध्ये १९८ भूखंडाचे आरेखन करुन १९१ भूखंडाचे वाटप झालेले आहे. ०७ भूखंड शिल्लक आहेत. आज रोजी ९७ भूखंडावर टेक्सटाईल उत्पादन सुरु आहे. यामध्ये सुमारे १७३८ इतका स्थानिकांना रोजगार निर्माण झालेला आहे.

(iii) अतिरिक्त नवापूर औद्योगिक क्षेत्रात मे.जनरल पॉलिफिम्स प्रा.लि. (मेगा प्रोजेक्ट) यांचेकडून ७०० कोटींची गुंतवणूक करण्यात येत आहे. या उद्योगात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष १००० इतका रोजगार निर्माण होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील ट्रान्स ठाणे क्रिक औद्योगिक क्षेत्रातील शेकडो वृक्षांची कत्तल करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(६) * २१८०० श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवी मुंबई येथील ट्रान्स ठाणे क्रिक औद्योगिक क्षेत्रातील ओपन स्पेस २१ मध्ये शासनाने एक कोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत लावण्यात आलेल्या शेकडो वृक्षांची कत्तल करून अनधिकृतरित्या उभारण्यात आलेल्या झोपडपट्टीवर तसेच दोषी अधिकाऱ्यांवर व कंपन्यांवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत झोपड्यांवर व दुरुस्ती देखभाल करणाऱ्या कंपन्यांवर आणि संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक जनतेतून सतत होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

याबाबत काही स्थानिक नागरिकांकडून कारवाई करण्यासाठी तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अतिक्रमण निष्कासनासाठी पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी पोलीस विभागाकडे पत्रव्यवहार सुरू आहे. पोलीस बंदोबस्त उपलब्ध होताच सदर जागेवरील अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मराठवाडा वॉटर ग्रीडच्या कामाला सुरुवात करण्याबाबत

**(७) * २१७०१ श्री.अंबादास दानवे, श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १९१६८ ला दिनांक २० जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील नागरीकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प सुरु करण्याची घोषणा सन २०१६ मध्ये केली असून अद्यापी उक्त प्रकल्पाच्या कामास सुरुवात झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाडा वॉटर ग्रीड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सन २०१९ मध्ये शासनाने प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली असून, मराठवाडा वॉटर ग्रीड या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात शासनाने जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत परतूर, मंठा, पैठण, गंगापूर-वैजापूर, सिल्लोड, जळकोट-उदगीर, हदगाव-हिमायतनगर व भोकर-अर्धापूर-मुदखेड या ग्रीड योजना मंजूर केल्या असून, सदर योजनेचे कार्यारंभ आदेश निर्गमित केले असून, योजनांची कामे सद्य:स्थितीत प्रगतीपथावर असल्याने त्यादृष्टीने करण्यात येत असलेल्या कामांची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकल्पाचा सविस्तर अहवाल बनविण्यासाठी विभागास ५० कोटी इतक्या रकमेची आवश्यकता असून उक्त बाबीकडे शासनाकडून जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने सदरहू प्रकल्पाच्या कामास सुरुवात होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाचे काम तात्काळ सुरु होण्याच्या दृष्टीने तसेच सदरहू प्रकल्पाचा सविस्तर अहवाल बनविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
परतूर, मंठा, पैठण, गंगापूर-वैजापूर, सिल्लोड, जळकोट-उदगीर, हदगाव-हिमायतनगर व भोकर-अर्धापूर-मुदखेड या योजना जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनानुसार मंजूर करण्यात आल्या असून सदर योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) व (५) मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या स्वतंत्र लेखाशीर्षांतर्गत आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये रुपये ५०.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यातील ४५ ट्रॉमा केअर सेंटर्स कार्यान्वित करण्याबाबत

**(८) * २१२५५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपघातग्रस्त रुग्णांना त्वरित उच्च दर्जाचे उपचार आणि वैद्यकीय सेवा मिळावी याकरीता राज्यातील सर्वच जिल्ह्यात ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याचा निर्णय गतवर्षी शासनाने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये १०८ ट्रॉमा केअर सेंटरला मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी ६३ ट्रॉमा केअर सेंटर्स कार्यान्वित झाले असून अजून ४५ ट्रॉमा केअर सेंटर विविध कारणांमुळे अद्याप कार्यान्वित करण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वाढत्या अपघातांची संख्या पाहता जी ट्रॉमा केअर सेंटर्स पूर्णत्वास आली आहेत ती रुग्ण सेवेत आणण्याची गरज असून याकडे आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू ट्रॉमा केअर सेंटर्स कार्यान्वित करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत : (**१) नाही.

(२) होय.

(३) व (४) राज्यातील ४५ अकार्यान्वित ट्रामा केअर युनिट पैकी १७ चे बांधकाम पूर्ण झालेले असून उर्वरीत २८ ट्रॉमा केअर युनिट कार्यान्वित करण्याची कार्यवाही वेगवेगळया स्तरावर सुरु आहे. बांधकाम पूर्ण झालेल्या १७ पैकी १५ ट्रामा केअर युनिटची पद निर्मिती झालेली आहे. यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाकडे सुरु आहे. सदर ट्रामा केअर युनिटसाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट क व ड पदभरतीची जाहिरात प्रसिध्द करुन उमेदवारांची परीक्षा घेण्याची प्रक्रिया टीसीएस या कंपनीमार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य व आयुष्मान भारत योजनेतील लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार व शस्त्रक्रियेचा लाभ मिळण्याबाबत

**(९) * २२०९७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, ॲड.अनिल परब, श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेश कराड,**

**श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य व आयुष्मान भारत योजनेतील लाभार्थ्यांना मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत लाभ देण्याचा अध्यादेश दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी शासनाने निर्गमित केला असून नागपूर विभागातील रुग्णालयाच्या सॉफ्टवेअरमध्ये या उपचाराची मर्यादा १.५ लाख रुपये असल्याने संबंधित रुग्णांना याचा कोणताही फायदा होत नसल्याचे माहे सप्टेंबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा अध्यादेश दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला असला तरी, सदर योजना कशी राबवायची याचे कोणतेही निर्देश संबंधित रुग्णालयांना देण्यात आले नसल्याने तसेच रुग्णाची नोंदणी आणि संबंधित कागदपत्रे अपलोड करताना विलंब लागत असल्याने रुग्णांना उपचारापासून वंचित रहावे लागत असून, अध्यादेश निर्गमित होण्यापूर्वी ज्यांची नावे नोंदविण्यात आली आहेत त्यांनाच योजनेचा लाभ देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत फेरनिर्णय करुन राज्यातील गरीब रुग्णांना या योजनेचा लाभ देण्यासाठी सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

दिनांक २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयात एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना हमी तत्त्वावर राबविण्याचे नमूद केले आहे. तथापि, सदर योजना हमी तत्त्वावर राबविण्यासाठी अंमलबजावणी सहाय्य संस्थांची नेमणूक करणे, अंगीकृत रुग्णालयांमध्ये आरोग्यमित्राची नियुक्ती करणे, योजनेच्या आज्ञावलीत बदल करणे, सोसायटी स्तरावर मनुष्यबळाची नियुक्ती इ. बाबी कराव्या लागणार आहेत. सदर सर्व बाबी पूर्ण करण्याकरीता काही कालावधी लागणार असल्याने दिनांक २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संपूर्णपणे हमी तत्त्वावर योजना राबवण्याची यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत सध्याच्या पध्दतीनुसार (विमा आणि हमी तत्त्वावर) मात्र सुधारित तरतुदींनुसार योजना राबविण्याची निर्देशित केले आहे. त्यानुसार एकत्रित योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नव्याने विमा कंपनीची निवड करण्याकरीता निविदा प्रक्रियेबाबतची आवश्यक प्रशासकीय कार्यवाही सध्या सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर योजना राज्यात कार्यान्वित होईल.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक २८ जुलै, २०२३ च्या शासन निर्णयानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नव्याने विमा कंपनीची निवड करण्याकरीता आवश्यक प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर योजना राज्यात कार्यान्वित होईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात सर्पदंशावरील लस उपलब्ध करून देण्याबाबत

**(१०) * २१७१८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्पदंशामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये वाढ झाली असून सर्पदंशामुळे होणारे मृत्यू हे प्रामुख्याने वेळेत उपचार न मिळाल्याने होत असल्याने दुर्गम भागातील शेतकरी, शेतमजुर व नागरिकांना विशेषत: १० ते ५० वयोगटातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्पदंश झालेल्या रूग्णास वेळेवर उपचार मिळाल्यास ९० टक्क्यांहून अधिक व्यक्तींचा जीव वाचविणे शक्य असल्याने त्यानुषंगाने सर्पदंशाबाबतच्या अंधश्रध्दा निर्मुलनासाठी ग्रामीण शाळांमध्ये माहितीपट व जनजागृती विषयक कार्यक्रम राबविणे, प्रत्येक गावात सर्पदंश उपचार प्रशिक्षण व संशोधन केंद्र स्थापन करणे, इ. उपाययोजनांसह धोरण निश्चित करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांचेकडे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चोकशी करून सर्पदंशावरील लस प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सध्यास्थिती राज्यात एकूण १९०८ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असून नियमितपणे प्राथमिक आरोग्य केंद्रास मागणीनुसार सर्पदंशलस साठा पुरविण्यात येतो. माहे ऑक्टोंबर, २०२३ पर्यंत एकूण ५४४२६ सर्पदंश लशी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर तसेच भिवंडी (जि. ठाणे) शहरातील व ग्रामीण भागातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(११) * २१४६७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९५५२ ला दिनांक २० जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात तसेच ग्रामीण भागात वैद्यकीय अभ्यासक्रमाची कोणतीही पदवी नसलेले सुमारे ४०० ते ५०० डॉक्टर कार्यरत असल्याची तसेच भिवंडी शहरात व तालुक्यातील सोनाळे, कारिवली, कोनगाव, खोणी-खाडीपार, शेलार, रांजणोली-सरवली, पुर्णा आदी भागात कोणताही वैद्यकीय परवाना व नोंदणी नसताना बोगस डॉक्टरांनी क्लिनिक उघडल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा बोगस डॉक्टरासंदर्भात स्थानिक नागरिकांनी संबंधित आरोग्य विभागाकडे तक्रारी करुनही विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असून बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी तालुका व जिल्हास्तरावर असलेल्या समित्यांद्वारे सदर डॉक्टरांवर कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय शिक्षण न घेतलेल्या व रुग्णांची फसवणूक करणाऱ्या बोगस डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ चे कलम ३३, ३६ व भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४१९ व ४२० अंतर्गत बोगस डॉक्टरांवर संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून मा. न्यायालयामार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली येथील शासकीय महिला व बाल रुग्णालयात प्रसुतीनंतर तीन मातांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१२) * २१६०६ श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली शासकीय महिला व बाल रुग्णालयात प्रसुतीनंतर तीन मातांचा मृत्यू झाल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदर रुग्णालयात अधीक्षक पद गेल्या १ वर्षापासून रिक्त असून प्रसुतीतज्ञ, बालरोगतज्ञ, भूलतज्ञ, क्ष-किरण तज्ञ ही पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच प्रसुतीनंतर होणारे मातांचे मृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यातील बालरोग तज्ञ आणि स्त्री रोग तज्ञ यांची पदे सरळ सेवेने आणि पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. सद्य:स्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत स्त्री रोग तज्ञ आणि भूलतज्ञ यांची प्रत्येकी २ पदे कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करून आरोग्य सुविधा देण्यात येत आहेत.

माता मृत्यू कमी करण्यासाठी माता मृत्यूची कारणे शोधून त्यावर उपाययोजना करण्यात येतात यामध्ये प्रसूती पूर्व व दरम्यान जोखमीच्या माता शोधून त्यांच्यावर उपचार व पाठपुरावा करण्यात येतो. तसेच जास्तीत जास्त प्रसूती रुग्णालयात करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच विविध कार्यक्रम उदाहरणार्थ जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, फ्री रेफरल, फ्री ट्रीटमेंट प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान इत्यादी उपायोजना करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील 'बिग बाजार' आणि 'रिलायन्स स्मार्ट बाजार' मॉल्स व्यवस्थापनावर कारवाई करणेबाबत

**(१३) * २११४२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील 'बिग बाजार' आणि 'रिलायन्स स्मार्ट बाजार' मॉल्सच्या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य कामगारांची पिळवणूक होत असल्याप्रकरणी चौकशी करून मॉल्स व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करण्याबाबतची मागणी लेखी निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कामगार मंत्री महोदयांकडे दिनांक १ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सर्वसामान्य कामगारांची पिळवणूक करणाऱ्या 'बिग बाजार' आणि 'रिलायन्स स्मार्ट बाजार' मॉल्स व्यवस्थापनाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशत खरे आहे. याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कामगार मंत्री महोदय यांच्याकडे मुंबईतील बिग बाजार आणि "रिलायन्स स्मार्ट बाजार" मॉल्सच्या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य कामगारांची पिळवणूक होत असल्याबाबत दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे.

(२) सदर निवेदनामध्ये नमूद केलेल्या बाबींचे संदर्भात कामगार कार्यालयाकडे कामगार अथवा त्यांच्या संघटनेच्या तक्रारीचे निवेदने प्राप्त नाहीत. तथापि, निवेदनाच्या अनुषंगाने स्थानिक लोक प्रतिनिधीकडून तसेच बिग बाजार आणि रिलायन्स स्मार्ट बाजार व्यवस्थापन, कामगार/कामगार प्रतिनिधी यांचेकडून निवेदनाच्या अनुषंगाने सविस्तर तपशील प्राप्त करुन मॉल व्यवस्थापन, कामगार/कामगार प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात येत आहे. बैठकीनंतर प्राप्त तपशीलाच्या आधारे कामगार कायद्यातील तरतूदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाह्ययंत्रणेच्या माध्यमातून मनुष्यबळ घेण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(१४) * २१२६५ श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.कपिल पाटील, श्री.अनिकेत तटकरे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या बाह्ययंत्रणेच्या माध्यमातून मनुष्यबळ घेण्याबाबत उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने दिनांक १४ मार्च २०२३ व दिनांक ६ सप्टेंबर २०२३ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित केला असून शिक्षण व विविध विभागांत बाह्ययंत्रणेकडून वर्ग २, ३ आणि ४ च्या १८६ संवर्गाच्या भरतीसाठी नऊ बाह्य सेवापुरवठादार संस्थांच्या कंत्राटदारांना मान्यता देण्याचे शासन निर्णयात नमूद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सेवा पुरवठादार संस्थाची निवड करून बाह्ययंत्रणेच्या माध्यमातून कंत्राटी भरतीचा निर्णय घेतल्यामुळे आतापर्यंत चार विभागांतील ११ हजार २०३ जागांवर कंत्राटी भरतीचे निर्णय जाहीर झाले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२३ पर्यंत याच पध्दतीने लाखो पदे भरण्यात येणार असल्याने राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या सर्व पदवीधारक विद्यार्थ्यांवर आणि डीएड, बीएड धारकांना शासकीय सेवेत कायमस्वरूपी नोकरी मिळणार नसल्याने राज्यभरातील सर्व बेरोजगारांकडून आणि पालकांकडून व शासकीय कर्मचाऱ्यांकडून सदर निर्णय मागे घेण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,शासकीय नोकरी मिळविण्यासाठी विद्यार्थी १८-१८ तास अभ्यास करीत वर्षानुवर्षे तयारी करीत असताना बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नियुक्त केल्यामुळे नियमित सेवा वेतन हमी, सेवानिवृत्त वेतन हमी व सेवा सातत्य हमी यामुळे घटनात्मक आरक्षणास मुकावे लागणार असल्याने व परिणामी राज्यात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी असताना शासनाने सदरचा निर्णय तात्काळ रद्द करावा अशी मागणी शासकीय कर्मचारी संघटना तसेच शिक्षक संघटना तसेच बेरोजगार उमेदवारांनी व राजकीय पक्षांनी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील जनतेचा व कर्मचारी संघटनेचा त्याबाबत असलेला प्रचंड विरोध लक्षात घेता शासनाने सदरचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशत: खरे आहे. राज्यातील विविध विभाग/ कार्यालयात बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी कामगार विभागाने ९ सेवापुरवठादार संस्था/ एजन्सीच्या पॅनलला दिनांक ०६/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली होती. त्यामध्ये कुशल, अतिकुशल, अर्धकुशल व अकुशल या चार वर्गवारीमध्ये एकूण १३८ वेगवेगळ्या पदांचा अंतर्भाव करण्यात आला होता.

सदर ९ एजन्सींपैकी ८ एजन्सींचे पत्ते महाराष्ट्रातील असून केवळ एका एजन्सीचा पत्ता महाराष्ट्राबाहेरील आहे.

प्रस्तुत शासन निर्णयासोबतच्या SOP मध्ये सदर एजन्सी व मनुष्यबळ यांच्या सेवेसंदर्भात अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत.
(२) सदर शासन निर्णयास अनुलक्षून या विभागाने ४ एजन्सीमार्फत १३४७ मनुष्यबळ घेण्यास एकूण १० विभागांना मान्यता दिली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सदर शासन निर्णय रद्द करण्याबाबत विविध संघटना, संस्था यांनी शासनाकडे मागणी केली आहे.

(३) प्रशासनामार्फत खर्च आटोक्यात ठेवून विकास कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय विभागांनी शक्य असेल तेथे पदनिर्मिती न करता संबंधित कामे बाह्ययंत्रणेकडून करुन घेण्याबाबत वित्त विभागाच्या सूचना आहेत. त्यानुसार उक्त पॅनल नियुक्त करण्यात आले आहे.
(४) सदर पॅनलवरील एजन्सीकडून बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळाच्या सेवा घेण्यास वित्त विभागाने ज्या पदांना मान्यता दिली आहे अशाच पदावर मनुष्यबळ घेतले जाते. त्यामध्ये सरळसेवेच्या पदांचा समावेश नाही. त्यामुळे कोणालाही आरक्षणास मुकावे लागते, असे म्हणणे वस्तुस्थितीवर आधारित नाही.

तथापि, सदर शासन निर्णय रद्द करण्यासंदर्भात विविध संघटना, लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदन दिली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(५) सदर शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३ रोजी रद्द करण्यात आला आहे.

-----------------

## उरण (जि. रायगड) तालुक्यातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता डम्पिंग ग्राउंडसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१५) * २१७६३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) येथील नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढल्याने तेथील गावागावांमध्ये कचऱ्याचे प्रमाणही वाढले असून उरण तालुक्यातील ग्रामपंचायतींकडे कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उरण तालुक्यात ३५ ग्रामपंचायती असून सदर ग्रामपंचायतींमध्ये डम्पिंग ग्राउंडची सुविधा नसल्यामुळे सर्व कचरा रस्त्याच्या दुतर्फा टाकला जात असल्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरल्याने नागरिकांची गैरसोय होत असून साथीचे रोग पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या स्वच्छतेच्या योजनांकडे लक्ष केंद्रित करण्याच्या आवाहनाला ग्रामपंचायती प्रतिसाद देत नसल्याने परिसरात अस्वच्छता पसरुन जनतेचे आरोग्य धोक्यात आले असून सदर विभागातील लोकप्रतिनिधींनी सिडको तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडे डम्पिंग ग्राउंडच्या जागेसाठी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डम्पिंग ग्राउंडची जागा देणेबाबत शासनाने कोणती उपायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे,

काही ठिकाणी कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नाही.

(२) नाही, हे खरे नाही,

(३) होय, हे अंशत: खरे आहे,

सिडको व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागणी केली आहे.

(४) ६ ग्रामपंचायतीचा कचरा जवाहरलाल नेहेरू पोर्ट ट्रस्ट मार्फत उचलून त्याच्या अखत्यारीतील घनकचरा प्रकल्पावर नेण्यात येतो व उरण हद्दीत / सिडको हद्दीतील आणि इतरत्र ग्रामपंचायती मध्ये निर्माण होणारा कचरा सिडको मार्फत उचलून पनवेल येथील तळोजा प्रकल्पावर (Bombay Waste Management) नेला जातो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोणगाव (जि.बुलढाणा) येथील अंगणवाडी इमारतीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१६) * २१७४४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोणगाव (जि.बुलढाणा) येथे बांधण्यात आलेल्या अंगणवाडी इमारतीचे गत सात वर्षांपासून काम पूर्ण न झाल्याने तेथील ग्रामस्थांनी आंदोलन केले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अंगणवाडीसाठी महिला व बालविकास विभागाने लाखो रुपयांचा निधी मंजूर करूनही अंगणवाडीची इमारत पूर्ण न झाल्याने येथील बालकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अंगणवाडीच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करून, बालकांकरीता वापरण्यास देण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सदर अंगणवाडीतील बालकांसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून भाड्याचे इमारतीमध्ये अंगणवाडी केंद्र चालविण्यात येत आहे.
(३) व (४) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०१३-१४ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या अंगणवाडी इमारत बांधकामाचा निधी बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकलेला आहे. यामध्ये सदर अंगणवाडीच्या निधीचा समावेश आहे. सदर बॅंक बंद पडल्याने निधी प्राप्त होऊ शकलेला नाही. जिल्हा परिषदेमार्फ़त सदर निधी मिळणेबाबत पाठपुरावा सातत्याने सुरु आहे.
जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०१३-१४ मधील डोणगांव, ता.मेहकर येथील अपूर्ण असलेल्या सदर अंगणवाडी इमारतीचे बांधकाम पूर्ण करणेसाठी जिल्हा परिषदेमार्फ़त जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन अपूर्ण अंगणवाडीचे बांधकाम पूर्ण करण्यात येईल. तसेच ग्रामपंचायतींना प्राप्त होणाऱ्या

निधीमध्ये विकास आराखड्यात अपूर्ण असलेल्या अंगणवाडी इमारत बांधकामांचा समावेश करणेबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी निर्देश दिलेले आहेत.

-----------------

## चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.

**(१७) * २१३७१ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाला स्वतंत्र इमारत नसून याठिकाणी डॉक्टर, परिचारिका, सफाई कामगारांची अनेक पदे रिक्त असल्याचे, तसेच खाटा नसल्याने रुग्णांना जमिनीवर उपचार घ्यावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार महिन्यांपासून रुग्णालयातील एक्स-रे यंत्र बंद असून औषधसाठा नसल्याने रुग्णांना बाहेरुन औषधे खरेदी करावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील असुविधांचा आढावा घेऊन तेथे आवश्यक मनुष्यबळ व सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) सदर संस्थेत रिक्त पदे ही पदोन्नती व सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सुरु असून संस्थेत रुग्णसेवेच्या दृष्टीने आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि. ठाणे) येथील सेंच्युरी रेयॉन कारखान्यात नायट्रोजन टँकरचा स्फोट होऊन कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१८) * २१०८२ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर कॅम्प क्र. १ शहाड गावठाण येथील सेंच्युरी रेयॉन कारखान्यात नायट्रोजन टँकरचा स्फोट होऊन चार कामगारांचा जागीच मृत्यू व सहा जण जखमी झाल्याचे दिनांक २३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्फोटामुळे शहाड व आजुबाजूच्या तानाजीनगर, गुलशननगर, धोबी घाट, शिवनेरीनगर परिसरातील घरांना जबरदस्त हादरे बसले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरहू दुर्घटनेतील मृत व जखमी कामगारांना नुकसानभरपाई अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच सदरहू दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या कंपनी प्रशासन व इतर दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

यापूर्वी सदर कारखान्याचे नाव सेंच्युरी रेयॉन असे होते. सद्या या कारखान्याचे नाव ग्रासिम इंडस्ट्रिज लिमिटेड, (युनिट-सेंच्युरी रेयॉन) पो. बॉ. २२, मुरबाड रोड, शहाड, ता.उल्हासनगर, जि.ठाणे असे आहे.

सदर कारखान्यात दिनांक २३ सप्टेंबर, २०२३ रोजी टँकरच्या टाकीचा स्फोट होऊन चार कामगारांचा मृत्यू झाला व पाच कामगार जखमी झाले आहेत.

चार किरकोळ जखमी झालेल्या कामगारांना औषधोपचारानंतर दिनांक २४ सप्टेंबर, २०२३ रोजी दवाखान्यातून घरी सोडण्यात आले असून ते चारही कामगार दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी कारखान्यात कामावर रुजू झालेले आहेत. तसेच उर्वरीत एका कामगारास दिनांक ०४ ऑक्टोबर,२०२३ रोजी दवाखान्यातून घरी सोडण्यात आले असून तो घरुन उपचार घेत आहे.
(२) हे खरे नाही.

सदर स्फोटामुळे आजुबाजूच्या परिसरात आवाज झाला होता.तथापि, याबाबत पोलीस ठाण्यामध्ये तक्रार प्राप्त झालेली नाही.

तसेच कुठल्याही प्रकारचे नुकसान झालेले नसल्याचे तहसिलदार, उल्हासनगर, जिल्हा ठाणे यांनी कळविले आहे.
(३) सदर घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने केलेली आहे. कार्बन डाय सल्फाइड (CS२) हे ज्वालाग्रही रसायन टँकरच्या टाकीमध्ये भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी टॅंकरची तपासणी करीत असताना टँकरच्या टाकीचा स्फोट झाल्याचे दिसून आले.

कारखान्यात येणाऱ्या टॅंकरमधील वायु तपासणी करण्याची सुरक्षित पध्दत नसल्याचे आढळून आल्यामुळे कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७ (अे)(२)(अे) च्या कायदेभंगाबाबत कारखान्याचे भोगवटादाराविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी ठाणे, यांचे न्यायालयात दिनांक ०९/११/ २०२३ रोजी एक खटला दाखल केला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या पत्राव्दारे सदर कंपनीचा सी.एस.२ हा प्लांट पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याबाबत कारखान्यास कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

तसेच दिनांक २३ सप्टेंबर २०२३ रोजी कारखाने अधिनियम १९४८ मधील तरतुदीस अनुसरुन कारखान्यातील कार्बन डाय सल्फाईड विभाग बंद करण्याबाबत आदेश देण्यात आले होते.

तदनंतर सदर आदेशात नमूद केलेल्या बाबींची पुर्तता केल्याने कार्बन डाय सल्फाईड विभाग दिनांक १५/१०/२०२३ पासून पुन्हा सुरु करण्यात आला आहे.

याप्रकरणी भारतीय दंड संहिता मधील कलमान्वये संबंधित पोलीस स्टेशनला दिनांक २४/०९/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून टँकर मालकास दिनांक २३/११/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर घटनेच्या अनुषंगाने संबंधित कामगार अधिकाऱ्यांनी या आस्थापनेस भेट देऊन विविध कामगार अधिनियमातंर्गत निरीक्षण शेरे पारित केले असून व्यवस्थापनाने या निरीक्षण शेऱ्यांच्या अनुषंगाने पूर्तता अहवाल सादर केला आहे.

कारखाना व्यवस्थापनाने मृत कामगारांच्या वारसास प्रत्येकी रुपये १५ लाख असे एकूण रुपये ६० लाख सानुग्रह अनुदान दिलेले आहेत.

तसेच चार मृत कामगारांच्या वारसांना द्यावयाची देय नुकसान भरपाईची रक्कम एकूण रुपये ५६,१३,५००/- नुकसान भरपाई मा.आयुक्त, कामगार न्यायालय, ठाणे यांचेकडे जमा करण्यात आली आहे.

पाच जखमी कामगारांचा अद्याप पर्यंतचा दवाखान्याचा खर्च रुपये ६,७२,४८६/- कारखाना व्यवस्थापनाने केला आहे.

चार मृत कामगारांच्या वारसांस नोकरी देण्याचे कारखाना व्यवस्थापनाने मान्य केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिध्दनाथ वाडगांव (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतील रिक्त पदे भरून औषधांचा साठा उपलब्ध करून देणेबाबत.

**(१९) * २१२८६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिध्दनाथ वाडगांव (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासह उपकेंद्रासाठी आरोग्य सेवक व सेविका यांच्या एकूण मंजूर २२ पदांपैकी १७ पदे रिक्त असून सदर आरोग्य केंद्राअंतर्गत ४७ गावांचा समावेश असून सदर गावांची लोकसंख्या जवळपास ५५,००० एवढी असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्रातील १०८ रुग्णवाहिकेला मागील एक महिन्यांपासून डिझेल नसल्यामुळे रुग्णवाहिका विनावापर उभी आहे तसेच, औषधांचा साठा उपलब्ध नसल्यामुळे देखील रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिध्दनाथ वाडगांव (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत व औषधांचा साठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, सिध्दनाथ वाडगांव, ता.गंगापुर येथे आरोग्य कर्मचाऱ्यांची एकूण २६ पदे मंजूर आहेत. यापैकी ०९ पदे भरलेली असून १७ पदे रिक्त आहेत. उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही. सदर आरोग्य केंद्रातील १०८ रुग्णवाहिकेला इंधनासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नियमित अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. १०८ रुग्णवाहिका सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे सदर रुग्णवाहिका इंधना अभावी उभी ठेवण्यात आलेली नाही.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्र, सिध्दनाथ वाडगांव, ता.गंगापुर येथे मुबलक प्रमाणात औषध साठा उपलब्ध असून जिल्हा नियोजन समितीमधुन प्राप्त निधीतून औषध खरेदी करण्यात आली आहे. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रास तातडीची औषधी खरेदी करणेसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत रुपये १,३१,०००/- इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे औषधीची कमतरता नाही. ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत गट-क सरळसेवा पदभरतीच्या अनुषंगाने एकूण ४३२ पदांची जाहिरात दिनांक ०५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. यात आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य सेवक (पुरूष) या संवर्गातील ६२ पदांचा व आरोग्य सेवक (महिला) या संवर्गातील २४४ पदांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालयासह क्षेत्रिय कार्यालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त केल्याबाबत.

**(२०)** * **२१८१७ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या क्षेत्रिय कार्यालय व मंडळ मुख्यालयी ब्रिक्स इंडिया प्रा. लि. एजन्सी मार्फत कनिष्ठ लेखापाल, लिपिक टंकलेखक, डेटा एन्ट्री ऑपरेटर, शिपाई इत्यादी पदांवर कंत्राटी कर्मचारी सलग ९ वर्षांपासून कार्यरत असून, त्यांची सेवा दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास समाप्त करण्यात आली असून या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी विविध पदांवर वेळो-वेळी कार्यालयातील प्रत्येक आदेशानुसार कार्यालयीन कामे तसेच कोविड कालखंडात खंड न पडता फ्रंट लाईन वर्कर म्हणून काम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील लाखो बांधकाम कामगारांची मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनेतंर्गत नोंदणी नुतनीकरण व लाभासंबंधी कामे, किट वाटप, आरोग्य तपासणी, मध्यांन्ह भोजन योजना तसेच हजारो ऑनलाईन अर्जांची तपासणी करून पुढील कार्यवाही करीता कागदपत्रे तयार करणे इत्यादी कामे या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १८ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रानुसार या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवा समाप्ती करण्याचे निर्देश दिल्यामुळे कर्मचारी आर्थिक अडचणीत आले असून वयोमर्यादा जास्त झाल्यामुळे नवीन नोकरी मिळणे कठिण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तथा निर्देश देवून कर्मचाऱ्यांना पुर्व पदावर कायम करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजाकरीता ब्रिक्स इंडिया प्रा.लि यांचे मार्फत २४४ कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचे मार्फत मंडळातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाचे प्राथमिक टप्यातील कामकाज करण्यात येत होते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक १८/०१/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मे. ब्रिक्स इंडिया प्रा.लि. या मनुष्यबळ पुरविण्यासाठी सेवापुरवठादार संस्थेला देण्यात आलेली मुदतवाढ संपुष्टात आणण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीगोंदा व संगमनेर (जि.अहमदनगर) येथील शासकीय रुग्णालयांचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

**(२१)** * **२२०२९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम करण्यास दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे, तसेच संगमनेर येथेही शासकीय रुग्णालय बांधकामास मंजूरी मिळाली असून अद्यापपर्यंत सदरील दोन्ही रुग्णालयांच्या कामास सुरुवात झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीगोंदा आणि संगमनेर येथे वाढत्या लोकसंख्येमुळे रुग्णालयांची आवश्यकता असून ग्रामस्थांना उपचारासाठी ६० ते ८० किलोमीटर लांब जावे लागत असल्याने, सदरील दोन्ही रुग्णालयांचे बांधकाम सुरू करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधीसह विविध संघटनांनी शासनाकडे वेळोवेळी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील दोन्ही रुग्णालयांचे बांधकाम सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) होय.

तथापि, श्रीगोंदा व संगमनेर जि.अहमदनगर येथे सध्यस्थितीत ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित असून येथे येणाऱ्या सर्व रुग्णांना आरोग्य सोयी - सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) श्रीगोंदा येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकामास शासन निर्णय दिनांक ०८/०२/२०२२ अन्वये रुपये १०६०.०० लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी जागा कमी पडत असल्याने जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.सदर जागा प्राप्त होताच बांधकामाची पुढील कार्यवाही तातडीने करण्यात येईल. घुलेवाडी (संगमनेर) येथील १०० खाटांचे बांधकामास शासन निर्णय दिनांक ०४/०३/२०२२ अन्वये रुपये २९७०.०० लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर बांधकामाची निविदेबाबतची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यास्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील १८ जिल्ह्यातील हत्तीरोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२२) * २२३५७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १८ जिल्ह्यातील विशेषतः चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, भंडारा, नांदेड, अकोला, नंदुरबार व पालघर या जिल्ह्यात हत्तीरोगाचा प्रादुर्भाव कायम असून, हत्तीरोग रुग्णांची संख्या ३० हजार ३३४ तर अंडाशय वृध्दी रुग्णांची संख्या ७ हजार २५६ रुग्ण आढळून आल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन १९७५ पासून हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू करण्यात आला असून हत्तीरोग बाधितांवर सर्व शासकीय रुग्णालयात मोफत उपचार व उपाययोजनांमुळे राज्यातील ८ जिल्ह्यांमधील हत्तीरोग नियंत्रणात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यांतील हत्तीरोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) होय.

१८ संवेदनशील जिल्हयांपैकी १० जिल्हे अकोला, जळगाव, सिंधुदुर्ग, अमरावती, यवतमाळ, वर्धा, सोलापूर, लातूर, धाराशिव व ठाणे हे जिल्हे हत्तीरोग दुरीकरणाच्या अंतिम टप्प्यात आहेत.

हत्तीरोग रुग्णांना विकृती व्यवथापन (MMDP) कीटचे वाटप, अंडवृध्दी रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया, हत्तीरोग दूषित रुग्णांना DEC चा उपचार तसेच समस्याग्रस्त जिल्ह्यातील १ वर्षावरील व गर्भवती वगळून सर्व लोकांना वर्षातून एकदा एक दिवसीय औषधोपचार मोहिम राबविण्यात आल्याने सध्या हत्तीरोग नियंत्रणामध्ये आलेला आहे.

(३) हत्तीरोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खालील उपाय योजना करण्यात येत आहेत. सामुदायिक औषधोपचार मोहिम - सध्या राज्यात गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, पालघर, ठाणे, नंदुरबार व नागपूर या ठिकाणी फेब्रुवारी व ऑगस्ट, २०२३ मध्ये सामुदायिक औषधोपचार मोहिम घेण्यात आली. या मोहिमेत ३७,२५,३५५ लोकांना हत्तीरोग विरोधी गोळ्या खाऊ घालण्यात आल्या.

• विकृती व्यवस्थापन :- विकृती व्यवस्थापन (MMDP) कीटचे वाटप करण्यात आले. सन २०२२ मध्ये २४५४३ इतके किट वाटण्यात आले तर सध्या ऑक्टोबर, २०२३ पर्यंत ९६६३ किट वाटण्यात आले असून अजून किट वाटपाचे काम प्रगतीपथावर आहे.

• अंडवृध्दी शस्त्रक्रिया :- सन २०२२ मध्ये ३२५० तर ऑक्टोबर, २०२३ पर्यंत २१९६ अंडवृध्दी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

• नियमित उपचार :- नियमित विशेष मोहीम तपासणीत आढळून आलेल्या हत्तीरोग संक्रमित रुग्णांची पडताळणी करुन सदर रुग्णांना हत्तीरोग विरोधी गोळीचा नियमित उपचार देऊन समुपदेशन करण्यात आले.

• डास नियंत्रण :- डास नियंत्रणाकरीता कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करुन आढळून आलेले डास अळी दूषित कंटेनर रिकामे करणे अथवा अबेट टाकणे तसेच डास्योत्पत्ती स्थानामध्ये गप्पी मासे सोडणे,

कोरडा दिवस पाळणे, डास विरोधी क्रीम, अगरबत्ती, मॅट इ. चा वापर करुन डासांपासून संरक्षण करणे याबाबत आरोग्य शिक्षण देण्यात येते.

• समस्याग्रस्त जिल्हयांमध्ये डासांपासून संरक्षण करण्यासाठी सन २०२१-२२ या वर्षात ४.५२ लाख कीटक नाशक भारीत मच्छरदाण्यांचे वाटप करण्यात आले.

• रात्र सर्वेक्षण :- यामध्ये हत्तीरोग ग्रस्त भागातील रक्त नमुने रात्रीच्या वेळी घेऊन तपासण्यात येतात.

• अळीनाशक फवारणी :- कार्यक्षेत्रातील निवडक हत्तीरोग ग्रस्त भागात क्षेत्र कर्मचाऱ्यांमार्फत डासांवर नियंत्रण ठेवण्याकरीता अबेट, बीटीआय पावडर या रसायनांचा वापर करुन डासोत्पती स्थानात फवारणी करण्यात येते.

• कीटकशास्त्रीय सर्वेक्षण :- उपलब्ध कीटक समाहाराकांच्या मार्फत कार्यक्षेत्रातील निवडक भागातील घरांमध्ये डास पकडून त्यांचे वर्गीकरण करणे, डास घनता काढणे, डासांचे विच्छेदन करणे व डासोत्पत्ती स्थाने तपासणे, इ. कार्यवाही करण्यात येते.

• जीवशास्त्रीय उपायोजना - गप्पी मासे सोडूयायोग्य स्थाने उदा. बिनवापराच्या विहिरी, टाकी, कारंजे, मोठे डबके, तलाव, मोठे नाले इ. ठिकाणी गप्पी मासे सोडून डासांची उत्पत्ती कमी केली जाते.

• आरोग्य शिक्षण - कार्यक्षेत्रातील जनतेस विविध माध्यमांद्वारे व प्रत्यक्ष भेटीमध्ये हत्तीरोगाचे कारण, प्रसाराचे कारण, डासोत्पत्ती, औषधोपचार, प्रतिबंधात्मक उपाय इ. बाबत आरोग्य शिक्षण दिले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पारेखनगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील कारखान्यांमध्ये बाल मजुरांकडून कामे करुन घेण्यात येत असल्याबाबत

**(२३) * २११८७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारेखनगर, एस.व्ही.रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथे औद्योगिक केंद्रातील विविध कारखान्यांमध्ये बाल मजुरांकडून कामे करुन घेण्यात येत असून बाल मजूरांना व इतर कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणेसुध्दा वेतन दिले जात नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी किती कारखान्यावर शासनाने कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) पारेखनगर परिसरातील कारखान्यामध्ये बाल कामगार आढळतात किंवा कसे, कामगारांना किमान वेतन व इतर देय लाभ मिळतात किंवा कसे याबाबत प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त, कामगार यांना आदेश देण्यात आले आहेत.

तसेच बालकामगार या प्रथेचे उच्चाटन करण्याच्या दृष्टिकोनातून कामगार विभागामार्फत विविध कार्यक्रमाचे आयोजन करून जनजागृती करण्यात येते. याकरीता गठीत करण्यात आलेल्या कृतिदलामार्फत बाल कामगारांचा शोध घेण्यासाठी वेळोवळी धाड सत्र आयोजित करण्यात येते.

सदरहू कृतिदलामार्फत जानेवारी, २०२३ ते ऑक्टोंबर, २०२३ पर्यंत मुंबई उपनगर (पश्चिम) विभागामध्ये एकूण ७ धाड सत्रांचे आयोजन करुन विविध आस्थापनांना भेटी देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये १ बाल कामगार व ३ किशोरवयीन कामगारांची मुक्तता करण्यात आली असून ३ मालकांविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनमध्ये २ एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेल्या आहेत.

तसेच कामगार विभागामार्फत आस्थापना भेटी/निरीक्षणाच्या वेळी किमान वेतन अधिनियमांतील तरतुदींचा भंग झाल्याचे आढळून आल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द अधिनियमांतील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील बाळापुर व अकोट येथे उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) * २१७६४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला असूनही, या रुग्णालयात अधीक्षक, वैद्यकीय अधिकाऱ्यांसह विविध विभागाच्या कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात अडचणी निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोट (जि.अकोला) येथे उपजिल्हा रुग्णालयाला मंजूरी प्राप्त झाली असूनदेखील प्रत्यक्षात रुग्णालयासाठी इमारत व आवश्यक ती पदे भरण्यास मंजूरी देण्यात आली नसल्यामुळे ग्रामीण रुग्णालयावर भार पडत असल्याने परिणामी रुग्णांना आवश्यक ते औषधोपचार मिळत नसल्याचे तसेच अकोट रुग्णालयात मंजूर झालेल्या २८ पदांपैकी वैद्यकीय अधीक्षक पदासह वैद्यकीय अधिकारी, स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, स्टाफ नर्स, जीएनएम, आरोग्य सहाय्यक, औषध निर्माता अशी १२ पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती कालावधीपासून सदरची पदे रिक्त आहेत व ती पदे रिक्त रहाण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त रिक्त असलेली पदे भरून रुग्णाची गैरसोय दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

अकोला जिल्ह्यामधील बाळापुर येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला असून सदर रुग्णालय ३० खाटावरुन ५० खाटांचे परवानगी प्राप्त झालेली आहे. सदर रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिक्षकांचे एक पद मंजूर असून ते रिक्त आहे हे खरे आहे. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांचे तीन पदे मंजूर असून ती सर्व भरलेली आहेत.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

अकोला जिल्ह्यामधील आकोट येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला असून सदर रुग्णालय ३० खाटावरुन १०० खाटांचे परवानगी दिलेली आहे. सदर रुग्णालयामध्ये एकूण २८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २३ पदे भरलेली असून ५ पदे रिक्त आहेत.

(३) बाळापुर येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षकांचे पद ०१ वर्षापासून रिक्त आहे. तसेच आकोट येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षकांचे पद ०४ वर्षापासून रिक्त आहे

(४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.

**(२५) * २१३५३ श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १६७६७ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यामध्ये २२१२ अंगणवाड्या असून त्यातील ६०० पेक्षा अधिक अंगणवाड्यांमध्ये विद्युत सेवा उपलब्ध नाही तसेच विद्युत सेवा असलेल्या ९० अंगणवाड्यांमधील विद्युत जोडणी कापण्यात आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील १२०० अंगणवाड्यांमध्ये लहान मुलांना खेळण्याकरीता एकही खेळणे उपलब्ध नसून शेकडो अंगणवाड्यांमध्ये साधनसामुग्री ठेवण्यासाठी कपाट, स्वयंपाक करण्यासाठी गॅस सिलेंडर व शुध्द पिण्याच्या पाण्यासाठी आरओची व्यवस्था नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०२२ अन्वये महिला व बालविकास सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत किमान ३% इतका निधी कायमस्वरुपी उपलब्ध करणेबाबत मान्यता देण्यात आली असून, त्यामध्ये नवीन अंगणवाडी बांधकाम तसेच अंगणवाडी केंद्रांना वीजपुरवठा करणे याबाबत तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व अंगणवाड्यामध्ये सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) अंशत: खरे आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेमध्ये जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत नागपूर जिल्ह्यामध्ये १९५१ अंगणवाडी केंद्र व २६१ मिनी अंगणवाडी केंद्र अशी एकूण २२१२ अंगणवाडी केंद्र आहेत. त्यापैकी १५८३ अंगणवाडी केंद्रामध्ये विद्युत सेवा उपलब्ध असून ६२९ अंगणवाडी केंद्रांना विद्युत जोडणी नाही.

(२) अंशत: खरे आहे.

अंगणवाडी विषयक माहिती खालीलप्रमाणे आहे.:-

| सुविधा | एकूण अंगणवाडी केंद्र | सुविधा असलेली अंगणवाडी केंद्र | सुविधा नसलेली अंगणवाडी केंद्र |
|---|---|---|---|
| खेळणी साहित्य | २२१२ | २२१२ | ०० |
| कपाट | २२१२ | ४८८ | १७२४ |
| गॅस सिलेंडर | २२१२ | १७१३ | ४९९ |
| पिण्याच्या पाण्यासाठी आरओ | २२१२ | १३८२ | ८३० |

सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात आयुक्तालयामार्फ़त नागपूर जिल्ह्यासह राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांना पूर्व शालेय शिक्षण संचाचा पुरवठा करण्यात आला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) अंगणवाडी केंद्रामध्ये सुविधा उपलब्ध करण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.:-

१) ज्या अंगणवाडी केंद्रांना विद्युत सेवा उपलब्ध नाही, अशा अंगणवाडी केंद्रांना ग्रामपंचायतीमार्फ़त विद्युत सेवा उपलब्ध करून देण्याबाबत सर्व गटविकास अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

२) जिल्हा परिषद सेस फंड अंतर्गत ५०० अंगणवाडी केंद्रामध्ये बास्केटबॉल, १५ वा वित्त आयोगाच्या निधीमधून जिल्हा परिषद स्तरावरून ३४१ अंगणवाडी केंद्राना सी-सॉ व १२३ अंगणवाडी केंद्रांना Slide हे खेळणी साहित्य पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे.

३) जिल्हा परिषद सेस फ़ंड अंतर्गत १३३ अंगणवाडी केंद्रांना कपाट व १९२ अंगणवाडी केंद्राना गॅस सिलेंडर पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे.

४) १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून जिल्हा परिषद स्तरावरून ज्या अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्यासाठी आरओ उपलब्ध नाही अशा सर्व अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्यासाठी आरओ पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे.

५) महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत कायमस्वरूपी उपलब्ध केलेल्या किमान ३ टक्के निधी अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ८१ व सन २०२२-२३ मध्ये १२५ असे एकूण २०६ अंगणवाडी केंद्र बांधकाम मंजूर करण्यात आले आहे. तसेच, सन २०२३-२४ मध्ये ९६ अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम प्रस्तावित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील बोट रुग्णवाहिकेचा देखभाल दुरुस्तीचा प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित असल्याबाबत

**(२६) * २१६४५ श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हा हा अतिदुर्गम भागात असून येथील आदिवासी समाजाला नदी ओलांडून आरोग्य सेवा उपलब्ध होण्याकरीता शासनाने बोट रुग्णवाहिका सेवा सुरु केली असून उक्त बोट रुग्णवाहिकांपैकी ३ रुग्णवाहिका या नादुरुस्त असल्याने आदिवासी बांधवांना आरोग्य सेवा मिळण्यास विलंब होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार यांचे अधिनस्त बोट रुग्णवाहिका देखभाल दुरुस्तीकरीता रुपये ३५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य संचलनालय, मुंबई यांचेकडे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास लवकरात लवकर मंजूरी देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे दिनांक ०१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली असून उक्त प्रस्तावास मंजूरी देण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व मागणीच्या अनुषंगाने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

३ बोट रुग्णवाहिकांपैकी १ बोट रुग्णवाहिका नादुरुस्त आहे. २ बोट रुग्णवाहिकांमार्फत आरोग्यसेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२३-२४ मध्ये बोट रुग्णवाहिका देखभाल दुरुस्तीसाठी रुपये ३१.५० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही..

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड सुरक्षा मंडळाचे अधिकारी यांनी नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

**(२७) * २१७८१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड सुरक्षा मंडळ हे निमशासकीय मंडळ असून या मंडळाच्या माध्यमातून सुरक्षा रक्षकांच्या नेमणुका केल्या जात असल्याने रायगड जिल्ह्यातील विविध कंपन्या, कार्यालयात सुरक्षा रक्षकाच्या नोकरीचे आमिष दाखवून अलिबाग, पेण तालुक्यातील हजारो तरुणांकडून रुपये ४० हजार घेऊन रायगड सुरक्षा मंडळाच्या अधिकारी यांनी गैरव्यवहार केला असल्याची बाब दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड सुरक्षा रक्षक मंडळ हे निमशासकीय मंडळ असतानाही कोणतीही जाहिरात न काढताच थेट सुरक्षा रक्षक भरती करित असल्याचे तसेच मुलाखती आणि पैसे देऊन चार वर्षे होऊनही या तरुणांना नोकरी मिळाली नसून प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुरक्षा रक्षक मंडळाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या भरतीसाठी रितसर जाहिराती काढून बेरोजगार तरुणांची नेमणूक करण्यासाठी आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तसेच सदर प्रकरणी गैरव्यवहार करण्याऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अलिबाग पोलीस ठाणे यांचेकडून प्राप्त माहितीनुसार श्री रमेश नामदेव देवरुखकर,पत्रकार यांनी पोलीस अधीक्षक, रायगड यांना दिनांक २७/०८/२०२३ रोजी आपले सरकार पोर्टलवर पत्र पाठवून रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील अधिकाऱ्यांनी पात्र उमेदवारांकडून नोकरी देण्याचे आमिष दाखवून करोडो रुपयांची खंडणी उकळल्याबद्दल तक्रार दाखल केली होती.
(२) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाद्वारे कोणतीही थेट भरती करण्यात येत नसून पात्र सुरक्षा रक्षकांचा समुच्चय (पूल) तयार करण्यात येतो. त्यानुसार समुच्चय (पूल) तयार करण्यासाठी दिनांक ०७/०३/२०१९ रोजीच्या दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, दैनिक कृषीवल व दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक ०७/०३/२०१९ ते दिनांक २१/०३/२०१९ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.
(३) मंडळाने एकूण ३२०१ सुरक्षा रक्षकांचा समुच्चय (पूल) तयार केला होता.त्यानुसार ज्या नोंदीत आस्थापनांनी सुरक्षा रक्षकांची मागणी मंडळाकडे केली आहे अशा आस्थापनांना ४५७ सुरक्षा रक्षक तैनात केले आहेत.

ज्या आस्थापनांनी वितरीत केलेल्या उमेदवारांना कर्तव्यावर हजर करुन घेतले नाही अशा ७३ आस्थापनांविरुध्द महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ कलम १४ अन्वये नोटीस बजावुन वसुलीची कार्यवाही सुरु केली आहे. २१ आस्थापनांना वेतन वसुल करणेबाबत मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नोटीस निर्गमीत झालेल्या आहेत. उर्वरीत ५० आस्थापनांविरुध्द कार्यवाही सुरु आहे.

ज्या आस्थापनांना जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग रायगड यांचेकडून वसुली प्रमाणपत्र निर्गमीत झाले आहे त्या आस्थापनापैकी ०६ आस्थापनांनी मंडळाच्या कारवाई विरुध्द मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत. सदर प्रकरणे अद्याप मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहेत.

प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी कामगार आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देव्हाडी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुखंडावर उद्योग सुरु न झाल्याबाबत

**(२८) * २२७४४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देव्हाडी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरात उद्योजकांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडावर वीज, पाणी व रस्ते अशा सुविधा उपलब्ध करुन देण्यात येऊनही सदर उद्योजकांनी उद्योग सुरु केले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या ताब्यात असलेल्या भूखंडापैकी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये उद्योग क्षेत्रासाठी राखीव ठेवण्यत आलेल्या भूखंडावर उद्योग उभारण्यासाठी उद्योजकांना अद्यापपर्यंत किती भुखंड उपलब्ध करुन देण्यात आले आहेत,

(३) असल्यास, शासनाच्या नियमानुसार जमीन उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर तीन वर्षांत उद्योग न उभारल्यास सदर भूखंड शासनाला परत करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून देण्यात आलेल्या भुखंडावर उद्योग उभारणी केली नसल्यास, सदर भूखंड परत घेण्याबाबत कोणतीही कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

(२) तुमसर औद्योगिक क्षेत्रात एकूण २४ भूखंडाचे वाटप गरजू उद्योजकास त्यांच्या प्रस्तावित उद्योगासाठी वाटप करण्यात आले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) तुमसर औद्योगिक क्षेत्रातील वाटप केलेल्या एकूण २४ भूखंडांपैकी १८ उद्योग घटक उत्पादनात गेलेले असून एकूण १७भूखंड धारकांनी इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला आहे. तसेच यापूर्वी सन २०१७ मध्ये २ भूखंड परत घेण्यात आलेले असून सदरहू भूखंडाचे वाटप नविन उद्योजकास करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत ज्या भूखंड धारकांनी इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केला नाही अशा ६ भूखंड धारकांना नोटीस निर्गमित करण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील नवजात बालकांचे मृत्यू रोखण्याबाबत

**(२९) * २१२७६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक दिवशी ४० नवजात बालकांचा मृत्यू होत असून यातील दोन तृतीयांश म्हणजेच २५ हून अधिक बालके १ महिन्यांहून कमी वयाची असल्याचे तसेच सदरील नवजात बालकांपैकी ६ जणांना श्वसनाचा त्रास होत असताना राज्यातील रुग्णालयात कृत्रिम श्वसन यंत्रणा आणि तिच्या वापरासाठी प्रशिक्षित वरिष्ठ कर्मचारी उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुसंख्य शासकीय प्राथमिक अतिदक्षता केंद्र (PICU) बालरोग व नवजात अतिदक्षता केंद्र (NICU) येथील गर्दी, अपुरा कर्मचारी वर्ग आणि अस्वच्छतेचा त्रास महिलांना होत असून या ठिकाणी नवजात बालके अत्यंत असुरक्षित असल्याने त्यांचे मृत्यू होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागातील वाढती प्रसुती व अर्भकांची संख्या जास्त असून प्रशासनामार्फत आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संख्येसह पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागातील प्रसुतीगृहांची संख्या वाढवून सदर ठिकाणी आरोग्य सुविधा पुरविण्याकरीता त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात नवजात बालकांचे होत असलेले मृत्यू रोखण्याकरीता शासनामार्फत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही,

राज्यात एप्रिल ते ऑक्टोंबर २०२३ पर्यंत ४८७२ नवजात बालकांचे (० ते २८ दिवस) मृत्यू झाले आहेत. त्यानुसार दरदिवशी २३ नवजात बालकांचा मृत्यू झाला असल्याचे दिसून येते. ७९५ बालकांचा मृत्यू हा श्वसनाचा त्रास होत असल्याने झाला आहे. नवजात शिशूच्यां उपचाराकरीता एकूण ५२ विशेष नवजात काळजी कक्ष स्थापन करण्यात आले असून त्याअंतर्गत श्वसनाच्या उपचाराकरीता CPAP मशिन आणि Surfactant उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच, SNCU मध्ये बालरोग तंज्ञांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच, प्रत्येक SNCU मधील वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारीका यांचे CPAP चे प्रशिक्षण राज्य स्तरावरुन घेण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही,
राज्यामध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यात येत आहे.
(४) राज्यात नवजात बालकांचे मृत्यू रोखण्याकरीता खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

- आजारी नवजात शिशूंच्या उपचाराकरीता ५२ विशेष नवजात काळजी कक्ष सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत कार्यरत आहेत.
- सर्व आजारी नवजात शिंशूकरीता शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत औषधे, तपासण्या तसेच वाहुतक लाभ देण्यात येतो.
- SAANS कार्यक्रमांतर्गत जंतुसंसर्ग झालेल्या नवजात शिशुंचे निदान व उपचार केले जातात.
- प्रत्येक FRU असलेल्या आरोग्य संस्थांमध्ये आजारी नवजात शिशुंकरीता NewBorn Stabilisation Unit (NBSU) व प्रत्येक प्रसुती गृहात नवजात शिशु काळजी कक्ष (NBCC) स्थापन करण्यात आलेले आहेत.
- नवजात बालकांची जन्मजात व्यंग तपासणी (Conprehensive New Born Screening) व उपचार केले जातात.
- गृहस्तरावर नवजात बालकांची काळजी (HBNC) कार्यक्रमांतर्गत ६ गृहभेटी देण्यात येतात.

- MAA कार्यक्रमांतर्गत स्तनपान संबंधी पालकांचे शिक्षण व समुपदेशन केले जाते.
- नियमित लसीकरण करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे पुरजळ (ता. औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गतच्या ठिकाणी उभारलेला सौर ऊर्जा प्रकल्प पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(३०) * २१७२९ श्री.श्रीकांत भारतीय : तारांकित प्रश्न क्रमांक १८२४७ ला दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरड शहापूर व जवळा बाजार (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) ही दोन गावे पुरजळ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतंर्गतच्या २० गावांमध्ये समाविष्ट असून सदर योजनेच्या ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी करण्यात आली असून दोन गावांच्या ग्रामपंचायतींनी प्रलंबित वीजदेयकांचा भरणा न केल्याने वीज वितरण कंपनीने माहे नोव्हेंबर, २०१९ पासून या योजनेचा वीज पुरवठा खंडीत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊर्जा विभागाच्या दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व ग्रामपंचातींच्या अखत्यारितील सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांची दिनांक ३० जून, २०२२ रोजी पर्यंतच्या प्रलंबित देयकांच्या मुद्दलाची रक्कम वसूल करून व्याज व दंडाची रक्कम माफ करण्याचा निर्णय घेतला असून, उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार शिरड शहापूर व जवळा बाजार या दोन्ही ग्रामपंचायतींनी सन २००५ ते महो एप्रिल, २०२२ या कालावधीतील प्रलंबित वीज देयकांच्या मुद्दल रकमेचा भरणा संबंधित वीज कंपनीकडे केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित वीज देयकांच्या मुद्दल रकमेचा भरणा केलेला असतानाही अद्यापपर्यंत उपरोक्त नमूद दोन्ही ग्रामपंचातीच्या हद्दीतील पाणीपुरवठा योजनेकरीता आवश्यक वीजपुरवठा अद्याप महावितरणकडून सुरू करण्यात आलेला नसल्याने सदरहू सौर ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणारी वीज ही वापराअभावी वाया जात असून या दोन्ही गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार शिरड शहापूर व जवळा बाजार या दोन्ही ग्रामपंचायतींनी प्रलंबित वीज देयकांच्या रकमेचा भरणा केलेला असतानाही त्यांच्या पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा सुरू न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने वीज पुरवठा किती कालावधीत सुरू करण्यात येणार असून विलंबास जबाबदार असणारे महावितरणचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मौ.पुरजळ व २० गांवे (ता.औंढा नागनाथ/वसमत) प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत माहे ऑक्टोबर-२०२२ अखेर ग्राहक क्र. ५३००२९००३८१० कडे रुपये १ कोटी व ग्राहक क्र.५३००२९००३८७० कडे रुपये १.१६ कोटी एवढी थकबाकी असल्याने दिनांक ०१/१२/२०२२ रोजी वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरूपात खंडीत केला होता.

माहे जून २०२२ अखेर पर्यंतचा व्याज व विलंब आकारा व्यतिरिक्त मुद्दल रक्कमेचा भरणा जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आला असता, दिनांक ०२/०५/२०२३ रोजी योजनेचा वीज पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तथापि, योजनेच्या ठिकाणी महावितरणच्या परवानगीशिवाय सौर प्रकल्प बसविला असून थकबाकी असल्याने त्यांच्या ग्रीड कनेक्टीव्हीटीकरीता ऑनलाईन अर्ज करता येत नाही. वीज वितरण कंपनीने योजनेचे नक्त मीटर (नेट मीटरिंग) व्यवस्थेची जोडणी न जोडल्यामुळे सदरहू सौर ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणारी वीज वापरा अभावी वाया जात आहे.

(४) सदर गावांनी जून -२०२२ अखरेची मूळ थकबाकी अनुक्रमे रुपये १३.५१ लाख व रुपये १०.८३ लाख इतकी रक्कम माहे एप्रिल-२०२३ मध्ये भरणा केला आहे. तथापि, जून २०२२ नंतरची चालू वीज देयके भरणा केला नाही.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रीडला जोडलेली परस्पर –सक्रीय छपरवरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा) विनिमय-२०१९ च्या नियम ६.६ नुसार, “वितरण परवानाधारकाकडे थकबाकी प्रलंबित असलेला ग्राहक या विनियमांतर्गत नक्त मीटर व्यवस्था किंवा नक्त देयक व्यवस्थेसाठी पात्र असणार नाहीत”. प्रलंबित देयकाचा भरणा केल्यानंतर सदरील ग्राहकांना सोलार रुफ टॉपकरीता मंजुरी देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बालकांसाठीच्या भारतरत्न ए. पी. जे अब्दुल कलाम आहार योजनेकरीता प्राप्त निधीमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत.

**(३१)** * **२१४९० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण अधिक असल्याने आदिवासी बालकांसाठी भारतरत्न ए. पी. जे अब्दुल कलाम आहार योजनेसाठी केंद्र शासनाने दिलेल्या निधीत तत्कालीन महिला अधिकारी यांच्याकडे महिला व बालविकास विभागाचा अतिरिक्त कार्यभार असताना कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार व अनियमितता झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून शासन सेवेतील तत्कालीन महिला अधिकारी यांच्या विविध पदांवरील कामांच्या बाबतीत व आर्थिक गैरव्यवहाराच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त असूनही सदर महिला अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेमध्ये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात उप मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यभार असताना तत्कालीन महिला अधिकारी यांनी प्लॉस्टिक व्यवस्थापन युनिट टेंडरमध्ये हस्तक्षेप करणे, भाडेतत्त्वावरील वाहनांमध्ये अपहार आदी विविध प्रकरणात गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सबंधित महिला अधिकाऱ्याने चुकीच्या मार्गाचा अवलंब केल्याने त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई होण्याबाबत सामाजिक संघटनांनी शासनास निवेदन देऊनही त्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नंदुरबार जिल्ह्यात भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत माहे एप्रिल २०२० ते जुलै, २०२० या कालावधीत झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक १४/०९/२०२० अन्वये सादर केलेला चौकशी अहवाल तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नंदुरबार यांनी दिनांक ५/११/२०२० अन्वये सादर केलेला चौकशी अहवाल आदिवासी विकास विभागाने स्वीकारल्याच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही कार्यवाही ग्रामविकास विभागाकडून करण्याची आवश्यकता नसल्याची ग्रामविकास विभागाची धारणा आदिवासी विभागाने पक्की केली असून, ग्रामविकास विभागाने व्यक्त केलेली धारणा पक्की करण्याच्या प्रस्तावास मा.मंत्री,महिला व बालविकास यांच्या सहमतीने आदिवासी विभागाने मान्यता दिलेली आहे.यास्तव ग्रामविकास विभाग स्तरावरील सदरचे प्रकरण बंद करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) (४) उपरोक्त (१) व (२) मध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता सबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य कामगार विमा योजनेंतर्गतची खाजगी रुग्णालयांतील सेवा पूर्ववत सुरू ठेवण्याबाबत

**(३२) * २११४१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १३३ रुग्णालयातील 'राज्य कामगार विमा योजेनचा' परतावा शासनाने मागील दीड वर्षांपासून दिला नसल्याने खाजगी रुग्णालयांनी या योजनेतील वैद्यकीय उपचाराबाबत असमर्थता दर्शविल्याने कामगारांवर सदर रुग्णालयांकडून उपचार केले जात नसल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी रुग्णालयांचा सुमारे २०० कोटी रुपयांचा परतावा शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून कामगारांसाठी जीवनदायी ठरलेल्या राज्य कामगार विमा योजनेंतर्गत खाजगी रुग्णालयांतील सेवा पूर्ववत सुरू ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्य कामगार विमा योजनेंतर्गत महा-राकावि सोसायटी मार्फत secondary medical care व राकावि महामंडळाकडून super speciality treatment करीता खाजगी रुग्णालयांशी टाय-अप करण्यात येऊन वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात. सद्य:स्थितीत महा-राकावि सोसायटीमार्फत २३ जिल्ह्यात २१६ खाजगी रुग्णालयांशी टाय-अप करण्यात आलेले आहे. आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे १०८ कोटींची देयके टाय-अप रुग्णालयांच्या स्तरावर प्रलंबित आहेत, ६६ कोटींची देयके राकावियो रुग्णालय/ वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांच्या स्तरावर आणि २ कोटींची देयके BPL (Bill Processing Agency) कडे प्रलंबित आहेत. परंतु, टाय-अप रुग्णालयांचा परतावा वेळेवर न दिल्यामुळे कोणत्याही खाजगी टाय-अप रुग्णालयाकडून secondary वैद्यकीय सेवा देणे बंद करण्यात आलेले नाही.

(३) प्रलंबित देयके तातडीने अदा करण्याबाबत महा-राकावि सोसायटीने दिनांक ०८/०६/२०२३, दिनांक २१/०६/२०२३, दिनांक ०६/१०/२०२३ व दिनांक २२/११/२०२३ रोजी VC Meeting द्वारे सेकंडरी टाय-अप रुग्णालये व वैद्यकीय अधीक्षक/ वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांच्या समवेत बैठक घेऊन प्रलंबित देयके अदा करण्याबाबत मार्गदर्शन व सुचना दिल्या आहेत. तसेच दिनांक १०/११/२०२३ व दिनांक १७/११/२०२३ च्या पत्रान्वये संबंधित वैद्यकीय अधीक्षक व वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांनाही सूचना दिल्या आहेत.

(४) प्रलंबित देयके अदा करण्याबाबत संबंधितांकडून कार्यवाही करण्यात येत असल्याने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील आरोग्यसेवक भरतीमध्ये पदाच्या पात्रतेकरीता दोन वेगवेगळया शैक्षणिक अर्हता लागू केल्याने अनेक उमेदवार परिक्षेपासून वंचित राहिल्याबाबत.**

**(३३)** * **२१८१८ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद आरोग्य सेवक पदाकरीता दिनांक ५ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट, २०२३ च्या दरम्यान होत असलेल्या भरती मध्ये आवश्यक पात्रता ही १० वी उत्तीर्ण तसेच दिनांक २९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द झालेल्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जिल्हा हिवताप कार्यालयाकडील आरोग्यसेवक भरती करीता समकक्ष पदासाठी १२ वी विज्ञान उत्तीर्णसह पॅरामेडिकल कोर्स, मूलभूत आरोग्य शिक्षण, सॅनिटरी इन्स्पेक्टर कोर्स उत्तीर्ण झाल्याची पात्रता ग्राहय धरण्यात आली असल्याचे माहे, ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या पदाकरीता पात्र परिक्षार्थी संभ्रमात आल्याने राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांवर अन्याय होवून दोन वेगवेगळया शैक्षणीक अर्हता लागु केल्यामुळे परिक्षेचा अर्ज भरण्यांस अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सध्या या परीक्षा घेणाऱ्या टी.सी.एस. व आय.बी.पी.एस. कंपन्यांकडून १०००/- रूपये परीक्षा फी आकारली जात असल्याने बेरोजगार तरूणांची लुट सुरू असल्याने असंतोष निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनातर्फे स्पष्टीकरण व सन २०१९ साली रद्द केलेल्या परीक्षा भरती मधील परिक्षार्थ्यांनी भरलेली परीक्षा फी परत देण्याचा शासन निर्णय होवूनही अद्यापही फी परिक्षार्थ्यांना परत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, परिक्षार्थींना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत : (**१) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत असलेल्या आरोग्य सेवक पदाचे सुधारित सेवाप्रवेश नियम दिनांक २९/०९/२०२१ रोजी अधिसुचित झालेले आहेत. सरळसेवेने शासनसेवेत प्रवेशासाठी प्रचलित असलेल्या सेवाप्रवेश नियमात नमूद शैक्षणिक अर्हता जाहिरातीत नमूद करण्यात येते. यास्तव दिनांक २८/०८/२०२३ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवक पदाच्या जाहिरातीत विहीत अर्हता नमूद करण्यात आलेली आहे.
(२) सार्वजनिक आरोग्य विभाग व जिल्हा परिषद यांची स्वतंत्र अर्ज प्रक्रिया व स्वतंत्र परीक्षा प्रक्रिया असल्याने अन्याय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही व अर्ज भरताना अडचण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) मा.मंत्रीमंडळाने दिनांक ३१/०१/२०२३ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक १४/०२/२०२३ रोजी निर्गमित शासन निर्णयानुसार सर्वसामान्य उमदेवारांकरीता रुपये १०००/- व मागासवर्गीय उमेदवारांकरीता रुपये ९००/- परीक्षा शुल्क विहीत करण्यात आलेले आहे.
(४) व (५) हे खरे आहे. तथापि, आरोग्य विभागाच्या दिनांक २४ व ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या परीक्षा पेपर फुटीमुळे रद्द झाल्याने या परिक्षेस प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या उमेदवारांचे परीक्षा शुल्क परत करण्याबाबतची पूर्वप्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सोळा आदिवासी जिल्हयांमध्ये कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.

**(३४) * २१८२८ श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अंबादास दानवे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १८९५३ ला दिनांक २० जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कुपोषणामुळे सोळा आदिवासी जिल्हयांमध्ये ६ हजार ६४६ मुलांचा मृत्यू तसेच माहे मे ते माहे ऑगस्ट, २०२३ या चार महिन्यांच्या काळात एक ते पाच वर्षे वयोगटातील ३१९७ बालकांचा मृत्यू झाला असून नंदुरबार जिल्ह्यात कुपोषणामुळे सर्वाधिक बालमृत्यू होत असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागातील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून आदिवासी भागात बालमृत्यू रोखण्यासाठी सन २०२२-२३ या वर्षासाठी मार्च महिन्याच्या अखरेपर्यंत रुपये ६११.२५ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले असताना केवळ ३२५.५६ लाख रुपये खर्च करण्यात आले असल्याने बालकांचे मृत्यू रोखण्यासाठी शासनाकडून करोडो रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात येऊन सुध्दा प्रत्यक्षात मात्र कोणतीही मदत त्यांच्यापर्यंत पोहचत नसल्याने बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यात शासनाला अपयश येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नंदुरबार, अमरावती, बीड, नाशिक व अहमदनगर या पाच जिल्ह्यांमध्ये माता मृत्यूचेही प्रमाण अधिक असून ६९,०५९ बालके कुपोषित असूनही केवळ तीव्र कुपोषणाच्या श्रेणीत नसल्यामुळे उपचारांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी भागात २८१ भरारी पथके स्थापन करण्यात आली असून सार्वजनिक आरोग्य विभागाकडून रुपये १८ हजार तर आदिवासी विकास विभागाकडून २२ हजार रुपये असे एकूण रुपये ४० हजार मानधन देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील सोळा आदिवासी जिल्हयांमधील बालमृत्यूचे तसेच माता मृत्यू व कुपोषित बालके यांच्या मृत्यूचे प्रमाण रोखण्याबाबत विविध योजना प्रभावीपणे राबवून, योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

राज्यात १६ आदिवासी जिल्ह्यात माहे एप्रिल २०२३ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत ४३२४ बालमृत्यू (० ते ५ वर्षे) झालेले आहेत. सदर बालमृत्यू Sepsis, Pneumonia, Prematurity, Sudden Infant Death, Congenital malformation, Respiratory distress इत्यादी वैद्यकीय कारणांमुळे आढळून आले आहेत. यामध्ये नंदुरबार जिल्ह्यातील ४२४ बालमृत्यूचा समावेश आहे. सदर बालमृत्यू कुपोषणामुळे झाल्याचे आढळून आले नाही. तसेच आदिवासी जिल्ह्यातील नवसंजीवनी भागात सन २०२२-२३ मध्ये १३०१ बालमृत्यूची नोंद आहे. तर सन २०२३-२४ मध्ये माहे ऑक्टोबर पर्यंत ६९९ बालमृत्यूची नोंद आहे.
(२) नवसंजीवनी योजनेंतर्गत आदिवासी भागात सार्वजनिक आरोग्य विभागास सन २०२२-२३ मध्ये प्राप्त अनुदान १४५५.३७ लाख असून त्यापैकी ८०% (रुपये ११५३.७७ लाख) खर्च झालेला आहे. आदिवासी भागात ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सतत प्रयत्न करण्यात येतात त्यामुळे नवसंजीवनी कार्यक्षेत्रात सन २०१९-२० मध्ये १७१५ बालमृत्यू झाल्याची नोंद असून सन २०२२-२३ मध्ये (३०% कमी) १३०१ बालमृत्यू झाल्याची नोंद आहे.
(३) हे खरे नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माहे सप्टेंबर, २०२३ च्या मासिक प्रगती अहवालानुसार राज्याची कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| एकूण वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण श्रेणीमधील बालके | मध्यम कुपोषित बालके | तीव्र कुपोषित बालके |
|---|---|---|---|
| ५८२७०६३ | ५३३५७१६ | ४१७३४९ | ७३९९८ |

सदर तीव्र कुपोषित बालकांना नियमीत आहाराबरोबरच अतिरिक्त आहार पुरविण्यात येतो. सदर आहारामधील पोषणमुल्य खालीलप्रमाणे आहेत.

| आहार | उष्मांक | प्रथिने |
|---|---|---|
| नियमित आहार | ५०० कि.कॅ. | १२ ते १५ ग्रॅ. |
| अतिरिक्त आहार | ३०० कि.कॅ. | ८ ते १० ग्रॅ. |
| एकूण | ८०० कि.कॅ. | २० ते २५ ग्रॅ. |

आजारी असलेल्या तीव्र कुपोषित बालकांना पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये दाखल करुन उपचार देण्यात येतात. सन २०२३-२४ मध्ये माहे एप्रिल २०२३ पासून ते माहे सप्टेंबर २०२३ अखेरपर्यंत राज्यातील ४५ पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये व २५ बाल उपचार केंद्र यामध्ये एकूण ४५७८ तीव्र कुपोषित बालकांवर उपचार करण्यात आलेले आहेत.

(४) हे खरे आहे.

(५) राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यातील बालमृत्यू व मातामृत्यू मध्ये घट होत असल्याचे दिसून येत आहे. कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर महिला, स्तनदा माता यांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो
- आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे. सदर योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी/ केळी देण्यात येतात. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.
- राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.
- राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## मुंबईतील जे.जे. व जी.टी. रुग्णालय परिसरात खाजगी पॅथॉलॉजिस्ट यांच्या मनमानी कारभाराबाबत

**(३५) * २१२६१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. व जी.टी. रुग्णालयातील रुग्णांच्या तपासणीसाठी खाजगी लॅबचे टेक्निशियन वॉर्डमध्ये जाऊन रुग्णांच्या करावयाच्या चाचण्यांचे नमुने गोळा करत असल्यामुळे रुग्णालय प्रशासनाने त्यांच्यावर पोलीस कारवाई सुरु केल्यानंतरही सदर टेक्निशियन गेट बाहेर उभे राहून रुग्णांना लॅबमध्ये घेऊन जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांच्या करावयाच्या चाचण्यांकरीता रक्ताचे नमुने सदर खाजगी लॅबमध्ये त्यांचे नातेवाईक घेऊन जातात तसेच अर्ज भरुन काही नमुन्यांची चाचणी केली जात नसून फक्त रिपोर्ट दिला जातो व या रिपोर्टवरील स्वाक्षरीसाठी डॉक्टरांना अधिक कमिशन मिळत असल्याने तसेच खाजगी लॅबमध्ये काही डॉक्टरांची पार्टनरशिप असल्याने रिएजंट नाहीत, मशीन बंद आहे असे सांगून रुग्णांना खाजगी लॅब मधूनच चाचण्या करण्याचे सल्ले संबंधित डॉक्टर देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जे. जे. आणि जी.टी रुग्णालयांच्या परिसरातील खाजगी लॅबधारक व संबंधित दोषी डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वालावल (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) येथील श्रीदेव लक्ष्मीनारायण मंदिरास "ब" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत

**(३६) * २१७५४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वालावल (ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) येथील श्रीदेव लक्ष्मीनारायण मंदिराचे वास्तुकाम हे हेमाडपंथी असल्याने या मंदिरास दरमाह लाखो भाविक तथा देशी व परदेशी पर्यटक भेट देत असून सद्य:स्थितीत या तीर्थक्षेत्रास "क" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐतिहासिक व प्राचीन वारसा असलेल्या या मंदिराची योग्य देखरेख व देखभाल करण्याकरीता आवश्यक निधी योग्य प्रमाणात उपलब्ध झाल्यास या मंदिराच्या देखभालीसह या मंदिरास भेट देणारे भाविक तथा पर्यटक यांना देखील आवश्यक मूलभूत सुविधा देणे शक्य होणार असल्याने सदरहू मंदिरास "ब" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत मंदिर प्रशासनाने देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर तसेच शासनाकडे रितसर प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांनी या मंदिरास "ब" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले असून, सदरहू प्रस्ताव सद्य:स्थितीत शासन स्तरावर प्रलंबित असून सदरहू प्रस्तावास मान्यता देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे पत्राव्दारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने मंदिरास "ब" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदरहू मंदिरास "ब" वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) ग्रामविकास विभागाच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ च्या शासननिर्णयानुसार "ब" वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देण्यासाठी असलेल्या अटींपैकी वनविभागाचा ना-हरकत दाखला आवश्यक असून सदर दाखल्यासाठी ग्रामपंचायतीकडून वनविभागाकडे दिनांक १८/०७/२०२३ रोजी ऑनलाइन अर्ज दाखल करण्यात आला आहे. तथापि, सदर अटीची पूर्तता न-झाल्याने शासनास प्रस्ताव अद्याप सादर केलेला नाही.

-----------------

## राज्यातील कुस्तीपट्टूंच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(३७) * २११४० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरीसारखे किताब जिंकून महाराष्ट्राची मान उंचावणाऱ्या राज्यातील कुस्तीपट्टूंना उतारवयात सन्मानाने जगता यावे, यासाठी शासनाकडून दरमाह देण्यात येणाऱ्या मानधनाच्या रकमेत गेल्या १३ वर्षामध्ये वाढ झाली नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक कुस्तीपट्टूंनी सदरहू मानधनाच्या रकमेत वाढ करण्याची मागणी वारंवार शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कुस्तीपटूच्या मानधनाच्या रकमेत वाढ करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) राज्यातील कुस्तीपटूंच्या मानधनाच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.